# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषि नगर – ४४४१०४ (महाराष्ट्र राज्य)

## ई-निविदा सुचना

**२०२०-२१**

No. DN/HORT/Chairman/E-Tender/Nursery,HDFS/83/2020 Date: 06/08/2020

**विषय: विविध प्रकारच्या फळपिकांची कलमे तयार करणे बाबत.**

[ई-निविदा (दर आधारित) ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे]

तांत्रिक व वित्तीय लिफाफा स्वीकारण्याची अंतिम तारीख

**दि. २१/०८/२०२० रोजी सा. ५.०० वा पर्यंत**

सदर ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी

अधिष्ठाता (उद्यानविद्या) तथा अध्यक्ष,
ई निविदा समिती-(रोपवाटिका, फळशास्त्र विभाग करिता विवध फळझाडांच्या कलम निर्मिती बाबत(
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
कृषि नगर, अकोला – ४४४१०४

***Web: www.pdkv.ac.in***

अधिष्ठाता (उद्यानविद्या )
तथा अध्यक्ष, ई-निविदा समिती
(विवध फळपिकांची कलम निर्मिती)
डॉ. पं.दे. कृ. वि. अकोला

# Tender schedule

**(Production of fruit crop planting materials)**

| SI | Particulars | Date | Time | Envelops |
|---|---|---|---|---|
| 1. | Release Tender | 11/8/2020 | 10.00 | |
| 2. | Pre bid conference date, time and venue on 14/08/2020 @ 11.30 hour in the office of the Dean, Faculty of Horticulture, Dr. PDKV, Akola | | | |
| 3 | Close for Technical bid | 21/08/2020 | 17.00 | Technical envelop T1 |
| 4 | Close for Price bid | 21/08/2020 | 17.00 | Commercial envelop C1 |
| 5 | Opening of technical bid | 24/08/2019 | 11.00 If possible | Technical envelop T1 |

Dean,
Faculty of Horticulture &
Chairman, for E-tender
Committee
Dr. PDKV, Akola

उद्यानविद्या विद्या शाखा

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

फोन क्र. ०७२४ २२५८५०८ ई-मेल:hdfs@pdkv.ac.in


**ई-निविदा सुचना**

ई-निविदा क्र. - १

फळपिके– पेरू, डाळिंब, लिंबू, संत्रा, मोसंबी, सीताफळ, हनुमानफळ, रामफळ, आंबा व चिकू

कंत्राटी पद्धतीने कलमे तयार करण्यासाठी निवेदितील नियम व अटी च्या अधीन राहून ई-निविदा मागविण्यात येत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. . | कामाचे नाव | बयाना रक्कम ( .) | सुरक्षा रक्कम | कामाचा कालावधी | निविदा पत्रकाची किंमत (रु.) | पात्रता वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | रोपवाटिका, फळशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला करिता कलमे तयर करणे | १५,०००/- | कामाचा आदेश देते वेळेस एकूण रकमेच्या २% जमा करणे | १८ महिन्या पर्यंत. | २०००/- | शासन मान्यताप्राप्त माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र धारक किंवा अनुभवी कुशल माळी कामगार किंवा कामगार आयुक्त परवानाधारक ठेकेदार किंवा रोपवाटिका परवानाधारक किंवा नोंदणीकृत व सदर कामाचा अनुभव असलेली संस्था. |

**कामाचे विवरणपत्र**

| अ.क्र. | फळपिकाचे नाव | कलमाचे प्रकार | अपेक्षित संख्या |
|---|---|---|---|
| १. | पेरू | गुटी कलम | २५,००० |
| २. | लिंबू | गुटी कलम | ५००० |
| ३. | डाळिंब | गुटी कलम | ५००० |
| ४. | सीताफळ | पाचर कलम | २५००० |
| ५. | हनुमानफळ | पाचर कलम | ५००० |
| ६. | रामफळ | पाचर कलम | ५००० |
| ७. | आंबा | पाचर कलम | १०००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | चिकू | पाचर कलम | ७००० |
| ९. | संत्र | डोळा कलम | ५०००० |
| १० | मोसंबी | डोळा कलम | २०००० |

सदरील कामाची व पात्रता वर्गा संबंधित सविस्तर ई-निविदा सूचना, वेळापत्रक, नियम व अटी इ. सर्व माहिती www.mahatenders.gov.in या पोर्टलवर प्रकाशीत करण्यात आली आहे.

अधिष्ठाता (उद्यानविद्या )
तथा अध्यक्ष, ई-निविदा समिती
(विवध फळपिकांची कलम निर्मिती)
डॉ. पं.दे. कृ. वि. अकोला

उद्यानविद्या विद्याशाखा

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

फोन क्र. ०७२४ २२५८७०८ ई-मेल:hdfs@pdkv.ac.in


**ई-निविदा प्रपत्र**

**कंत्राटी पद्धतीने कलमे करणेसाठी ईनिविदेचे तांत्रिक बाबीचे प्रपत्र'अ' व वित्तीय बाबीचे प्रपत्र 'ब'**

---

**प्रपत्र 'अ' तांत्रिक लिफाफा**

**सर्व प्रमाणपत्र स्कॅन करून ऑनलाईन निविदे सोबत जोडावीत.**

**(Technical Bid documents)**

| अ.क्र. | प्रमाणपत्र | होय | नाही |
|---|---|---|---|
| १. | निविदा धरकाचे अथवा निविदा धरकाकडील कामगारांचे माळी प्रशिक्षण प्रमाणपत्राची सत्यप्रत | | |
| २. | कमीत कमी मागील तीन वर्षाच्या विद्यापीठातील किंवा शासकीय/निमशासकीय कार्यालय/संस्था येथे कलमे तयार करण्याचे/ काम केल्याचे प्रमाण पत्र किंवा कामचा आदेश. (आवश्यक) | | |
| ३. | पॅन कार्डची छायांकित प्रत (आवश्यक) | | |
| ४. | निविदा समितीने निश्चित केलेल्या नियम, अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र (आवश्यक) | | |
| ५. | मागील दोन वर्षाचे आयकर भरल्याचे विवरणपत्राची सत्यप्रत | | |
| ६. | जी.एस.टी. नोंदणी क्रमांकाचे प्रमाणपत्र | | |
| ७. | बयाणा रक्कम ऑनलाईन भरणे बाबतच्या पावतीची प्रत (आवश्यक) | | |
| ८. | निविदा धारक हे नोंदणीकृत संस्था असल्यास संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व त्या संबंधित ईतर आवश्यक प्रमाणपत्रे. | | |

प्रपत्र 'ब' वित्तीय लिफाफा

Commercial Bid Document (price bid)

| अ.क्र. | विवरण | होय | नाही |
|---|---|---|---|
| १. | ऑनलाईन प्रणाली मध्ये कलमा प्रमाणे दर नमूद करणे | | |

दिनांक:

निविदाधरकाची सही :

निविदाधाराकाचे नाव :

पत्ता :

मोबाईल क्रमांक :

## ई-निविदा नियम व अटी

१. ई- निविदेतील सर्व तांत्रिक व वित्तीय बाबीची पूर्तता करण्याची जबाबदारी निविदा धारकाची आहे नियम व अटी वाचून मगच मान्य म्हणून स्वाक्षरी करावी व ती निविदा प्रक्रियेत सहभाग घ्यावा. तांत्रिक अडचणीमुळे ईनिविदा भरण्यास येणाऱ्या समस्या साठी कार्यालय जबाबदार राहणार नाही.

२. तांत्रिक प्रपत्रात नमूद केलेले सर्व प्रमाणपत्र तसेच नियम व अटी मान्य करून स्वाक्षरी केलेले प्रपत्र जोडणे (अपलोड करणे) आवश्यक आहे. ऑनलाईन द्वारे भरण्यात येणाऱ्या तांत्रिक लिफाफा मध्ये आवश्यक नमूद प्रमाणपत्रे स्कॅन करून नभरल्यास संबंधित निविदा रद्द करण्यात येईल.

३. पात्र ठेकेदारांना ऑनलाईन पद्धतीने निविदा भरता येईल. जाहिरातीतील दिलेल्या पोर्टलवर नोंदणी करून कागदपत्रे डाउनलोड करावी व सहभाग घ्यावा.

४. निविदा अर्जाची किंमत, बयाणा रक्कम, सेवाशुल्क इ. ऑनलाईन प्रणालीद्वारे भरावे लागेल व त्यावर कोणतेही व्याज किंवा विलंब आकार दिला जाणार नाही. शासकीय नियमानुसार देय होणारे संबंधित निविदा धारकास भरणे बंधनकारक राहील. दर सर्व कर समाविष्ट करून द्यावेत.

५. देयक सादर करताना, जीएसटी संबंधी शासन निर्णय जुलै २०१७ मधील नियम व अटी ची पूर्तता करण्याची जबाबदारी ही संबंधित ठेकेदाराची असेल.

६. तांत्रिक लिफाफा व दरपत्रक उघडण्याच्या दिलेल्या दिनांकास व वेळेस निविदा धारकास अथवा त्याने नेमलेल्या प्रतिनिधीस उपस्थित राहणे आवश्यक राहील (सदर निविदा दिनांक व वेळ मध्ये काही अपरिहार्य कारणास्तव एनवेळी बदल संभाव्य होऊ शकतो)

७. महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार कायदा-१९७० नुसार सर्व अभिलेख नियमित ठेवणे व ते कामगार कायद्या संबंधित अधिकाऱ्यांकडून तपासून घेणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

८. शासकीय विमा निधी व कामगार कायदा नुसार शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियमाची पूर्तता व अंमलबजावणी करणे तसेच बालमजूर कायदा १९८६ चे पालन करणे हे ठेकेदारास बंधनकारक राहील.

९. काम करणाऱ्या मजुरांचा सामूहिक विम्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल. कंत्राटी मजुरास काम करताना इजा, अपघात झाल्यास अथवा त्याचा मृत्यू झाल्यास किंवा नैसर्गिक आपत्ती उदा. पाऊस, वीज, भूकंप वादळ यामुळे होणारी इजा, अपघात झाल्यास अथवा त्यांची शारीरिक हानी उदा. विज पडणे, साप चावणे, झाडावरून पडणे इ. बाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

१०. कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार निविदा समितीस राहील.

११. कराराच्या संदर्भात कोणत्याही वाद निर्माण झाल्यास त्या संदर्भात अंतिम निर्णय निविदा समितीचा राहील.

१२. ठेकेदारास दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करणे बंधनकारक आहे.

१३. निविदा मंजूर करणे, काम समाधानकारक न केल्यास सदर निविदा रद्द करणे, अनामत रक्कम जप्त करणे याबाबतचे सर्व हक्क निविदा समितीने स्वतःकडे राखून ठेवले आहे.

१४. एकदा कामाचा करार झाल्या नंतर कंत्राटी पद्धतीने मजूर पुरवठा करण्याचे काम इतर व्यक्ती, ठेकेदार, अथवा कंपनी यांना देता येणार नाही.

१५. गुटी कलम करण्यासाठी लागणारे सर्व निर्जंतुकीरण केलेले साहित्य उदा. सिकेटर, कलम चाकू, पॉलिथिन, टोपले, सुतळी, मॉस, संजीवक इ. आवश्यक साहित्य व मनुष्यबळ कुशल, अकुशल कामगार ठेकेदारास स्वखर्चाने स्वतःहा आणावयाची आहेत. काम करणाऱ्या मजुरांना ओळखपत्र पुरविणे बंधनकारक असेल तसेच त्यांची राहण्याची व जेवणाची स्वतंत्र व्यवस्था संबंधित ठिकाणी ठेकेदाराने करणे आवश्यक आहे.

१६. गुटी कलम निर्मितीसाठी लागणारी गाळाची माती, भसवा, खते, कीड व रोगांपासून संरक्षण करणारी औषधे प्रक्षेत्रावर उपलब्ध होणार नाहीत ती सर्व ठेकेदारास स्वखर्चाने स्वतःहा आणायची आहेत. या विभागाद्वारे फक्त छापील पिशव्यांचा पुरवठा केल्या जाईल.

१७. अभिवृद्धी माध्यम भरतांना त्यामध्ये माती, रासायनिक खते, भसवा सोबत ट्रायकोडर्मा पावडर पी.एस.बी. जैविक खते यांचा वापर करावा सूत्रकृमी मुक्त अभिवृद्धी माध्यम वापरणे व सूत्रकृमी मुक्त गुटी कलमांचापुरवठा करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. तसेच सदरच्या कलमा ताब्यात घेते वेळेस त्या कलमांवर रोग अथवा किडींचा प्रादुर्भाव आढळल्यास सदरच्या कलमा या विभागाद्वारे ताब्यात घेतल्या जाणार नाहीत व त्यांचा मोबदला अदा केल्या जाणार नाही.

१८. विक्रीयोग्य कलमा ताब्यात घेईपर्यंत म्हणजे ३० जून २०२१ पर्यंत खुरपणी करणे, पाणी देणे, खते देणे, औषध फवारणी करणे, राखण/देखरेख करणे इत्यादी कामे ठेकेदार यांनी करावयाची आहे. कलमी ठेवण्यासाठी देण्यात आलेले शेडनेट पॉलिहाऊस नियमितपणे स्वच्छता ठेवण्याची व गवत काढण्याची जबाबदारी ठेकेदाराची असेल.

१९. भविष्यात कोविड-१९ सदृश्य परिस्थिती मुळे टाळेबंधी अथवा अन्य आपदा दरम्यान तयार केलेली कलमे जगविण्याची/ संगोपनाची जबाबदारी हि पूर्णपणे संबंधित कंत्राटदाराची असेल.

२०. कलम करण्यासाठी प्रक्षेत्रावर उपलब्ध असलेल्या कलम कांड्या व नेत्र कांड्या ह्या विद्यापीठ प्रक्षेत्रामध्ये उपलब्ध आहेत तरी सदरच्या कलम कांड्या व नेत्र कांड्या ह्या कामाच्या ठिकाणी आणण्याची व्यवस्था ठेकेदाराने करणे आवश्यक आहे तसेच ठेकेदारास कार्यालयाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत, पूर्वपरवानगी नुसार व कार्यालयीन वेळेतच काढाव्या लागतील. कलम कांड्या व नेत्र कांड्या काढतांना मातृवृक्षाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी व नियमितपणे कलम कांड्या व नेत्र कांड्या यांचा हिशोब संबंधित अधिकारी यांना देणे बंधनकारक असेल.

२१. ठेकेदारास पाचर कलम व डोळा कलम या मध्ये पुढील प्रमाणे किमान यशस्वी विक्री योग्ये कलमे ताब्यात देणे बंधनकारक राहील.

पाचर कलम (आंबा ६०%, सीताफळ, रामफळ, हनुमानफळ ७५%, चिकू ६५ %,) डोळा कलम (संत्र व मोसंबी प्रथम व द्वितीय बांधणी मिळून ७०%) कलमा ताब्यात घेतांना सदरची यशस्वी संख्या नमिळाल्यास खुंट रोपांची नुकसान भरपाई अदा करण्यात येणाऱ्या अंतिम टप्प्या मधून केल्या जाईल.

२२. **विविध कलमीकरण कामा दरम्यान कामाची प्रगती पाहून देय रक्कमेचा हप्त्या बाबत.**

**गुटी कलमा बाबत:** कामाची प्रगती पाहून दोन हप्त्यात देय रक्कम खालील प्रमाणे अदा करण्यात येईल.

**पहिला हप्ता-** लिंबू गुटी कलम, पेरू गुटी कलम व डाळिंब गुटी कलम मातृ वृक्ष पासून वेगळे करून संपूर्ण माध्यमांसह पॉलिथिनबॅगमध्ये घेतल्यानंतर तसेच कलमे फुटल्यावर, फुटलेल्या कलमाच्या आधारे व तयार होणाऱ्या कलमांच्या रकमेच्या ४० टक्के रक्कम अदा केल्या जाईल/ देय असेल.

**दुसरा हप्ता-** दुसरा हप्ता अदा करताना पिशवीतील गवत काढलेली, पुरेशी सशक्तीकरण झालेली रोग व कीडमुक्त विक्रीयोग्य कलमे १०० किंवा २००च्या गटांमध्ये लावून मोजून ताब्यात देणे ठेकेदारास बंधनकारक आहे तसेच मर झालेल्या कलमांची रोपवाटिकेच्या सूचनेनुसार विल्हेवाट लावावी लागेल.पहिला हप्ता वजा करून उर्वरित रक्कमयशस्वी कलमा नुसार अंतिम बिलामध्ये म्हणजे दुसऱ्याहप्त्यामध्ये ताब्यात घेतलेल्या एकूण यशस्वी कलमांच्या अनुषंगाने अदा केल्या जाईल.

**खुंट रोपांच्या पुरवठ्यासह पाचर कलम (Grafting) [आंबा, सीताफळ, हनुमानफळ, रामफळ, चिकू] बाबत** कामाची प्रगती पाहून **तिन हप्त्यात** देय रक्कम खालील प्रमाणे अदा करण्यात येईल.

**पहिला हप्ता-** पाचर कलम (आंबा, सीताफळ, रामफळ, हनुमानफळ, चिकू) ठेकेदाराने स्वखर्चाने स्वतः कलमे तयार करण्यासाठी एक ते दीड फुट उंचाची, पेन्सीलच्या जाडीची, जोमदार वाढीची, नोरोगी, कलाम करण्यास योग्य खुंट रोपे रोपवाटिकेत आणल्या नंतर तयर होणार्या कलमाच्या आधारे होणाऱ्या रक्कमेच्या २५ % रक्कम मिळेल.

**दुसरा हप्ता-** कलमे फुटल्यावर फुटलेल्या कलमाच्या आधारे व तयार होणार्या कलमाची होणार्या रकमेच्या २५ % रक्कम मिळेल.

**तिसरा हप्ता-** तिसरा हप्ता अदा करताना खुंट रोपावरील फुट व पिशवीतील गवत काढलेली, पुरेशी सशक्तीकरण झालेली रोग व कीडमुक्त विक्रीयोग्य कलमे १०० किंवा २००च्या गटांमध्ये लावून मोजून ताब्यात देणे ठेकेदारासबंधनकारक आहे तसेच मर झालेल्या कलमांची रोपवाटिकेच्या सूचनेनुसार विल्हेवाट लावावी लागेलपाचर कलम केलेल्या आंबा, सीताफळ, रामफळ, हनुमानफळ, चिकू संपूर्ण कलम संगोपना नंतर मोजून ताब्यात घेतल्या नंतर, पुरेशी हार्डनिंग झाल्यावर तिसरा हप्ता अदा केल्या जाईल. ताब्यात मिळालेल्या विक्रिया योग्य कलांच्या आधारे होणारी एकूण रक्कम मधून पहिल्या व दुसऱ्या हप्त्याची रक्कम तसेच इतर अटीमुळे होणारी नुकसान भरपाई वजा करून उर्वरित रक्कम अदा केल्या जाईल.

**खुंट रोपांच्या पुरवठ्या शिवाय पाचर कलम व डोळा कलम (Budding and Grafting)[आंबा, सीताफळ, हनुमानफळ, रामफळ,चिकू, संत्रा व मोसंबी]** बाबतकामाची प्रगती पाहून **दोन हप्त्यात** देय रक्कम खालील प्रमाणे अदाकरण्यात येईल.

**<u>पहिला हप्ता-</u>** आंबा, सीताफळ, हनुमानफळ, रामफळ, चिकू या मध्ये कलम बांधणी नंतर ५०% रक्कम एकूण संख्येच्या आधारे अदा करण्यात येईल तर संत्र व मोसंबी मध्ये प्रथम व द्वितीय डोळा कलम बांधणी नंतर ५०% रक्कम अदा करण्यात येईल.

**<u>दुसरा हप्ता-</u>** दुसरा हप्ता अदा करताना संत्रा व मोसंबीची यशस्वी कलमांची छाटणी करणे,कॅरी मध्ये लावून शेंडे कट करून (Topping) व खुंट रोपांवरील फुट काढणे बंधनकारक असेल तसेच ईतर कलमा मध्ये (आंबा, सीताफळ, हनुमानफळ, रामफळ, चिकू) खुंट रोपावरील फुट काढून, पुरेशी सशक्तीकरण झालेली विक्री योग्य कलमे १०० किंवा २०० च्या गटांमध्ये (कॅरी मध्ये) लावून मोजून ताब्यात देणे ठेकेदारास बंधनकारक आहे तसेच मर झालेल्या कलमांची रोपवाटिकेच्या सूचनेनुसार विल्हेवाट लावावी लागेल. पहिला हप्ता वजा करून उर्वरित रक्कम यशस्वी कलमा नुसार अंतिम बिलामध्ये म्हणजे दुसऱ्या हप्त्यामध्ये ताब्यात घेतलेल्या एकूण यशस्वी कलमांच्या अनुषंगाने अदा केल्या जाईल.

२३. निविदा मंजूर झाल्यानंतर ठेकेदारास रुपये पाचशे च्या स्टॅम्प पेपरवर निविदा समितीने ठरविलेल्या विहित नमुन्यात कामाचा करारनामा त्वरित करून द्यावा लागेल करारनामा स्टॅम्प पेपरचा खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे.

२४. निविदा मंजूर झाल्यानंतर निविदेच्या एकूण रकमेच्या २% रक्कम 'सुरक्षा अनामत रक्कम' म्हणून धनाकर्ष द्वारे कार्यालयास तात्काळ जमा करावी लागेल.

२५. ठेकेदाराने काम अर्धवट केल्यास, सोडल्यास झालेल्या कामाचे देयक अदा केले जाणार नाही तसेच संपूर्ण सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येईल यासंबंधीचा अंतिम निर्णय समितीचा असेल.

२६. ठेकेदाराचा किंवा त्यांच्या मजुराचा कार्यालयातील इतर कामात उपद्रव झाल्यास, कलम बांधणी कामात हलगर्जीपणा झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्याकडून काम काढून घेण्यात येईल.

२७. कामाचा आदेश दिल्यानंतर काम करण्यास असमर्थ ठरल्यास सुरक्षा रक्कम जमा करण्यात येईल व दुसऱ्या क्रमांकाच्या लघुत्तम निविदा धारकास त्यांनी नकार दिल्यास तिसऱ्या क्रमांकाच्या लघुत्तम निविदा धारकास त्यांनी प्रथम क्रमांकाच्या निविदा धारकाच्या दरात काम करण्याची समर्थता दर्शविली त्यांना काम देण्याचा अथवा न देण्याचा हक्क निविदा समितीस राहील.

२८. कामाचा कालावधी कामाचा आदेश दिल्यापासून १२ ते १८ महिने पर्यंत राहील तसेच आवश्यकता असल्यास कालावधी वाढविण्याचा अधिकार निविदा समितीस राहील.

२९. प्रक्षेत्रावरील कलमे, खुंट रोपे अथवा इतर उत्पादने कोणत्याही सबबीवर बाहेर नेता येणार नाही.

३०. कोणतीही निविदा पूर्ण पणे अंशतःस्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दर पत्रके नाकारणे याचे अधिकार हे गठीत समितीचे असतील.

३१. निविदा उघडल्यानंतर दराबाबत वाटाघाटीचे अधिकार निविदा समितीचे राहतील तसेच समान दराच्या निविदा आल्यास संबंधित निविदा धारकांची चर्चा करून निविदा निश्चित करण्यात येतील.

३२. काम मुदतीत पूर्ण करण्यासाठी रोपवाटिकेत पुरुष पुरेशा प्रमाणात कुशल माळी कामगार उपलब्ध होतील याची काळजी ठेकेदाराने घ्यावी.

३३. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ शासकीय संस्था असल्याने केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू आहे. यामुळे त्याअंतर्गत कागदपत्रे माहिती मागणाऱ्यास उपलब्ध केली जाऊ शकतात.

सर्व कायदेशीर बाबी अकोला जिल्हा न्यायालयाच्या कक्षे अंतर्गत राहतील.

सदर निविदेतील नियम व अटी मला मान्य आहेत.

निविदाधारकाचे सही

निविदाधारकाचे नाव- ..............................................

अधिष्ठाता (उद्यानविद्या)
तथा अध्यक्ष, ई-निविदा समिती
(विवध फळझाडांची कलम निर्मिती)
डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला